# निसर्गाचा आगळा उत्सव - गुहागर येथील 'सी विंड्स' सोबत

कोकणातील गुहागर म्हटलं, की डोळ्यासमोर उभा राहतो हिरवागार निसर्ग. त्या सुरेख हिरव्यागार निसर्गाच्या किनाऱ्याला तितकाच सुरेख निळाशार समुद्र म्हणजे एखाद्या चित्रकारानं काढलेला मास्टरपीस. उगाच नाही कोकणला कॅलिफोर्निया म्हटलं जातं!

गुहागर म्हटलं, की डोळ्यासमोर येतात नारळ, कोकम, काजू, आंबे, फणस, करवंद यांबरोबरच तिथल्या शाकाहारी आणि मांसाहारी जेवणाचे विविध चविष्ट प्रकार. याबरोबरीनंच गुहागरचं अजून एक वैशिष्ट्य आहे, ते म्हणजे तिथली विविध सुरेख देवालयं. गुहागरचं आणि या देवळांचं एक वेगळंच नातं आहे. शेकडो वर्षांपासून तिथे उभी असलेली ही देवस्थानं म्हणजे गुहागरच्या पवित्र भूमीवरील जणू काही मानाचे तुरे आहेत. त्या देवळांमधील ती शांतता, तिथल्या आरत्या आणि तिथला तो सर्व परिसर या सर्वांची मनाला एक वेगळीच ओढ लागते आणि मन वेगळ्याच ऊर्जेनं भरून जातं.



गणेशोत्सवानंतर तर गुहागरचं रूप अजूनच निखरून येतं. पावसामुळे सृष्टी जणू नवचैतन्य ल्यायल्यासारखी दिसते आणि निरनिराळ्या सणांमुळे सगळ्या वातावरणात एक वेगळाच उत्साह भरलेला असतो. आपण ज्याला समुद्राचं धन असं म्हणतो, ते वेगवेगळे



डॉ. जितेंद्र खेर

मत्स्य प्रकार देखील याच काळात भरपूर उपलब्ध असतात.

कोकणातील पर्यटनासाठी ऑगस्ट ते जून महिन्यापर्यंतचा काळ अतिशय उत्तम आहे. सप्टेंबर ते फेब्रुवारी या महिन्यात तर हवादेखील अगदी थंड असते. मुंबई-पुण्यापासून फक्त पाच-सहा तासांवर हे ठिकाण असल्यामुळे एक छोटा ब्रेक तुम्ही नक्कीच इथे घेऊ शकता. अशाच या गुहागरात डौलानं उभं आहे 'माउंटन रेंज'चं 'सी विंडस' हॉटेल. गुहागरातील व्याडेश्वर, दुर्गादेवी, उफराटा गणपती अशा विविध देवस्थानांपासून 'सी विंडस' अगदी हाकेच्या अंतरावर आहे. शिवाय वेळणेश्वर, हेदवी, गोपाळगड, अंजनवेलचं लाइट हाउस, ही नयनरम्य पर्यटनस्थळंदेखील इथून अगदी जवळ आहेत.



'सी विंड्स'चे रिसेप्शन

पर्यटक गुहागरमध्ये येतात ते गुहागर बीचच्या लोकप्रियतेमुळे. इथला समुद्रकिनारा हा पर्यटकांना भुरळ घालतो आणि 'सी विंडस' हे समुद्रकिनाऱ्यापासून अगदी जवळच आहे. नैसर्गिक सौंदर्य लाभल्यामुळे गुहागर हे एक उत्तम टुरिस्ट स्पॉट बनलं आहे. 'माउंटन रेंज'च्या 'सी विंडस'नं कित्येक देशी-विदेशी पर्यटकांना गुहागरमध्ये उत्तम पर्याय दिला आहे. 'माउंटन रेंज'चे संचालक डॉ. जितेंद्र खेर यांच्या कल्पक व्यक्तीमत्त्वातून नाविन्यपूर्ण उपक्रम उदयास येतात आणि ते यशस्वीपणे यशाची घोडदौड करतात. त्यातीलच एक म्हणजे गुहागरचं 'सी विंडस - द बीच हॉटेल'. समुद्रावरील वारा, शांततेत येणारा लाटांचा धीरगंभीर आवाज हे सर्व 'सी विंडस'मध्ये अनुभवायला मिळेल. एसी-नॉन एसी सुपिरिअर रुम्स, कपल्ससाठी खास एकांतातील गार्डन रुम्स, लक्झुरियस अशा स्वीट रुम्स या हॉटेलमध्ये उपलब्ध आहेत. कम्फर्ट लेव्हलपासून ते लक्झुरियस लेव्हलपर्यंतचा वेगळा दर्जा 'सी विंडस'नं निर्माण केला आहे. उत्तम दर्जाचं आणि स्वादिष्ट जेवण, त्याबरोबर लज्जतदार मालवणी तडका, याचा आस्वाद 'सी विंडस'च्या एसी व गार्डन रेस्टॉरंटमध्ये निसर्गाची मजा लुटत तुम्ही घेऊ शकता.

'सी विंडस' (समुद्री वारे) या समुद्रालगतच्या, समुद्रासोबतच्या हॉटेलमधला फॅमिलीसोबतचा किंवा मित्रपरिवारासोबतचा स्टे नक्की अविस्मरणीय राहील. हॉटेललगतचा परिसरसुद्धा नयनरम्य, डोळ्यांचं पारणं फेडणारा आहे. ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक, नैसर्गिक अशा विविधतेनं नटलेल्या गुहागरमध्ये 'हॉटेल सी विंडस' आपल्या स्वागतासाठी सज्ज आहे.

तर मग चला निसर्गाचा हा आगळा उत्सव साजरा करण्यासाठी त्वरित संपर्क करा.

**अधिक माहितीसाठी :**
**९९२०९९४२२९ / ९२२४५८६०६०**
**www.seawinds.in**